FOLLOW THE DRINKING GOURD

By Jeanette Winter

सप्तर्षी तारकांच्या दिशेत जा

जनेट विंटर, मराठी: सुशील मेन्सन



सप्तर्षी तारकांच्या दिशेत जा

जनेट विंटर, मराठी: सुशील मेन्सन

A NOTE ABOUT THE STORY

In the early days of slavery in the United States many slaves tried to escape their cruel bondage by fleeing north – usually to Canada - to freedom. By the 1840s a loosely organized group of free blacks, slaves, and white sympathizers formed a secret network of people and places that had escaped salves on their dangerous journey to freedom – a network that came to be known as the Underground Railroad.

Traveling along darkened roads at night, hiding out by day, moving slowly upriver along hundreds of miles of connecting waterways, the fugitive slaves endured many hardships. Slave catchers hunted them down with dogs. Many were shot or hanged. And even after crossing into the "free" states, runaway slaves could still be captured and returned to their masters for a reward.

The most famous conductor on the Underground Railroad was Harriet Tubman, a runaway slave herself, who led hundreds of her people to freedom. Among other conductors, there was a one-legged sailor named Peg Leg Joe. Joe hired himself out to plantation owners as a handyman. Then he made friends with the slaves and taught them what seemed a harmless folk song – "Follow the Drinking Gourd." But hidden in the lyrics of the song were directions for following the Underground Railroad. The Drinking Gourd is the Big Dipper, which points to the North Star. "When the sun comes back, and the first quail calls" meant spring, when travel might be least hazardous. As the runaway slaves followed the stars north, they would come across marks Peg Leg Joe had made in mud or in charcoal on dead trees – a left foot and a peg foot – and they would know they were on the right trail.

The river that "ends between the two hills" was the Tombigbee River. The second was the Tennessee River and the "great big river" was the Ohio River, where Peg Leg Joe would be waiting to ferry them across to the free states on the other side. From there the fugitives were guided from one hiding place to the next until – with luck – they made it to Canada or other safe places in the North.

कथेविषयी थोडे.....

अमेरिकेत गुलामी प्रथेच्या सुरुवातीच्या दिवसांत कित्येक गुलामांनी मुक्त होण्यासाठी पळून जाण्याचे प्रयत्न केले. हे गुलाम उत्तरेला कॅनडाच्या दिशेत जात असत. 1840 पर्यंत मुक्त काळे लोक, गुलाम आणि त्यांचे काही गोरे समर्थक यांनी परस्परांना संपर्क करण्यासाठी एक व्यवस्था तयार केली. ही व्यवस्था पळून जाणाऱ्या गुलामांना सुरक्षित स्थानांवर पोहोचण्यासाठी मदत करत असे. या व्यवस्थेला “अंडरग्राउंड रेलरोड” या नावाने ओळखले गेले.

गुलाम रात्रीच्या अंधारात प्रवास करत आणि दिवसा लपून राहात. अनेक कष्टसायास करून ते नदीकिनाऱ्याने चालत चालत शेकडो मैल अंतर पार करत. या गुलामांना शोधण्यासाठी त्यांचे मालक विशेष शिपाई आणि त्यांच्यासोबत कुत्रे पाठवत. “मुक्त” राज्यात पोहोचल्यावरही कधीकधी या गुलामांना छोट्याशा इनामासाठी कुणी पकडून मालकाच्या ताब्यात देत असत.

“अंडरग्राउंड रेलरोड” ची सगळ्यात महत्त्वाची ‘नायक’ होती हॅरियेट टबमन. तिने शेकडो गुलामांना मुक्ती दिली. दुसरा एक ‘नायक’ होता एका पायाचा नाविक पेग-लेग-जो. तो जमीनमालकांकडे जाऊन छोटीमोठी कारागिरीची कामे करत असे.

पेग-लेग-जो तिथे काम करणाऱ्या गुलामांशी मैत्री करत असे आणि त्यांना एक सहजसोपे गीत शिकवत असे - "फॉलो द ड्रिंकिंग गोर्ड". या गीतातील शब्दांमध्ये "अंडरग्राऊंड रेलरोड" म्हणजे गुलामीतून मुक्त होण्याचा मार्ग लपलेला होता.

"ड्रिंकिंग गोर्ड" म्हणजे "सप्तर्षी ताऱ्यांचा समूह". या ताऱ्यांच्या मदतीने ध्रुव ताऱ्याचे अढळ स्थान शोधता येते. त्यावरून गुलामांना उत्तर दिशा कळते. जसजसे गुलाम मुक्तीमार्गावर पुढेपुढे जातात तसतसे त्यांना पेग-लेग-जो याने चिखलात किंवा मृत झाडांवर कोळशाने रंगवलेली चिन्हे दिसत. डाव्या पावलाचा ठसा आणि लाकडी पायाचे चित्र, अशी ती चिन्हे असत. यामुळे गुलामांची खात्री होई की ते योग्य दिशेने जात आहेत.

"अंडरग्राऊंड रेलरोड" मार्गात टाँबिबी, टेनेसी आणि ओहायो या तीन नद्या लागत. पेग-लेग-जोच्या गीतामध्ये टाँबिबी नदीसाठी "दोन डोंगराच्या दरम्यान असलेली नदी" असे शब्द वापरले होते, तर ओहायो नदीसाठी "विशाल महान नदी" असे शब्द होते. ओहायो नदीवर पेग-लेग-जो पळून आलेल्या गुलामांची वाट पाहात असे. तो त्यांना नदीपल्याड एका मुक्त राज्यात सोडत असे. तिथे गुलाम एका सुरक्षित घरातून दुसऱ्या सुरक्षित घरात जाऊन राहात. असं करत करत दैवाने साथ दिली तर ते उत्तरेकडील कॅनडात किंवा एखाद्या सुरक्षित प्रदेशात पोहोचत.

Long ago before the Civil War there was an old sailor called Peg Leg Joe who did what he could to free the slaves.

अमेरिकेत नागरी युद्ध होण्याअगोदर पेग-लेग-जो नावाचा एक नाविक होता. त्याने गुलामांना मुक्त करण्याचा शक्य होईल तेवढा प्रयत्न केला.

Joe had a plan to use hammer and nail and saw, and work for the master. The man owned slaves on the cotton plantation.

पेग-लेग-जो सुतारकाम करण्यात पटाईत होता. तो कापसाच्या शेतमालकाकडे काम करत असे. तिथे बरेच गुलामही होते.

Joe had a plan at night when work was done he taught the slaves a song that secretly told the way to freedom. Just follow the Drinking Gourd it said.

पेग-लेग-जो रात्रीच्या वेळी त्या गुलामांना एक गीत शिकवत असे. गीताच्या शब्दांमध्ये त्यांच्या मुक्तीचा मार्ग लपलेला होता. पळून जाताना सप्तर्षी ताऱ्यांच्या दिशेने प्रवास करायचा, हे गुलामांना या गीतातून कळत असे.

When the song was learned and sung all day Peg Leg Joe would slip away and work for another master and teach the song again.

गुलाम गाणे शिकून दिवसभर गाऊ लागले की पेग-लेग-जो तिथून निघून जात असे. मग तो कुणा दुसऱ्या मालकाकडे काम करण्यास जात असे आणि तेथील गुलामांना ते गीत शिकवत असे.

One day a slave named Molly saw her man James sold to another master. James will be taken away and the family torn apart. Just one more night together.

एके दिवशी मोली या गुलाम स्त्रीचा पती जेम्स याला त्यांच्या मालकाने दुसऱ्या मालकाला विकले. कुटुंबापासून दुरावण्याच्या अगोदर जेम्सची ती शेवटची रात्र होती.

A quail calls in the trees that night. Molly and James remember Joe's song.

They sing it low:

मध्यरात्र सरल्यावर झाडांमधून बटेर पक्ष्याचा आवाज ऐकू आला. त्या आवाजाने मोली आणि जेम्सला पेग-लेग-जो याच्या गीताचे शब्द आठवले:

“When the sun comes up and the first quail calls, follow the Drinking Gourd.” They looked to the sky and saw the stars.

“भर पहाटवेळी, होतील बटेर जागे, होशील तू मुक्त, जर जाशील सप्तर्षींमागे.”
त्यांनी आकाशाकडे पाहिले. त्यांना त्यांचा वाटाड्या सप्तर्षी तारकासमूह दिसला.

Taking their son Isaiah, old Haddie and her grandson George, Molly and James set out for freedom that very night following the stars of the Drinking Gourd.

आपला मुलगा यशया, वृद्ध हॅडी आणि तिचा नातू जॉर्ज यांना घेऊन मोली आणि जेम्स मुक्तीच्या मार्गावर निघाले. ते सगळे सप्तर्षी ताऱ्यांच्या दिशेने चालू लागले.

They ran all night through the fields till they crossed the streams of the woods.

संपूर्ण रात्र ते शेतांमधून पळत राहिले. काही वेळा त्यांना जंगलातील लहान लहान नाले पार करावे लागले.

When daylight came they hid in the trees watching, listening for the master's hounds that were loose to find them.

सूर्योदयानंतर ते गर्द झाडींमध्ये लपून राहिले. तिथे त्यांना मालकाने पाठवलेल्या शिपायांचे आणि कुत्र्यांचे आवाज ऐकू आले.

But the dogs lost the runaway scent at the stream and Molly and James and Isaiah old Haddie and young George were not found. They hid all day in the woods.

पण नाल्याच्या गंधामुळे कुत्रे त्यांच्या शरीराचा गंध ओळखू शकले नाहीत. त्यामुळे शिपायांच्या नजरांपासून ते बचावले. पूर्ण दिवस ते गर्द झाडींमध्येच लपून राहिले.

At night they walked again singing Joe's song "Now the river bed makes it a very good road,

The dead trees were showing the way,The foot peg for travel, and follow the Drinking Gourd."

रात्री ते हळू आवाजात पेग-लेग-जो याचे गीत गात पुढे जाऊ लागले. "काया नदीची पथ आता, मृत वृक्षांच्या खुणा तिथे, पदचिन्हांना शोध त्यावरी, सप्तर्षींची दिशा धरी."

They looked for the signs that marks the trail. Sometimes empty bellies to sleep on.

ते मृत झाडांवरील पदचिन्हे शोधत सप्तर्षींमागे चालू लागले. कित्येकदा त्यांना रिकाम्या पोटी झोपावे लागे.

Sometimes no stars to guide the way.

कधी कधी ढग सप्तर्षी ताऱ्यांना झाकोळून टाकत. मग ते हतबल होत.

Walking by night, sleeping by day for weeks they travelled on. Sometimes berries to pick and corn to snatch and sometimes fish to catch.

रात्री चालत राहायचे आणि दिवसा लपून राहायचे, असा त्यांचा दिनक्रम काही आठवडे सुरू राहिला. रस्त्यात कधी ते बोरे खात तर कधी मका. कधी नदीतील मासे पकडून ते आपले पोट भरत.

They never knew what lay ahead. There was danger from men who would send them back and danger from hungry beasts. But sometimes a kind deed was done.

पुढे काय वाढून ठेवले आहे, याची त्यांना कल्पना नसे. काही लोक त्यांचा शोध घेत होते. पकडले गेले असते तर त्यांना पुन्हा मालकाकडे पाठवले गेले असते. प्रवासात वन्य प्राण्यांचेही भय असे. तर कधी चांगले अनुभवही येत.

One day as they hid in a thicket a boy from a farm found them. In a bag of feed for the hogs in the wood he brought bacon and corn bread to share. Singing low they traveled on.

एके दिवशी जंगलाजवळच्या शेतातील एक मुलगा डुकरांसाठी अन्न घेऊन जात होता. गर्द झाडींमध्ये लपलेल्या जेम्सच्या कुटुंबाला त्याने पाहिले. मग तो त्यांच्यासाठी पिशवीतून डुकराचे मांस आणि मक्याची रोटी गुपचुप घेऊन आला.

“The river is between the two hills, follow the Drinking Gourd.

There is another river on the other side, follow the Drinking Gourd.”

ते गीताच्या पुढच्या ओळी आठवू लागले. “दोन डोंगरांमध्ये नदी पहुडली, सप्तर्षींची दिशा पकडली, दुसरी आणखी एक नदी त्या, दिशेत जाता सापडली.”

On and on they followed the trail to the river's end. From the top of the hill they saw the new path – another river beneath the stars to lead them to freedom land. The Drinking Gourd led them on. The song was almost done.

ते नदीकिनाऱ्याने चालत राहिले. डोंगराच्या माथ्यावरून त्यांना सप्तर्षी ताऱ्यांच्या खाली आणखी एक नदी दिसली. मुक्तीच्या मार्गावर पुढे घेऊन जाणारी नदी! सप्तर्षी खरोखरच त्यांचा मार्गदर्शक बनले होते. आता गीताच्या शेवटच्याच काही ओळी उरल्या होत्या.

“When the great big river, meets the little river, follow the Drinking Gourd,

For the old man is waiting to carry you to freedom, if you follow the Drinking Gourd.”

“छोट्या नदीस मोठी मिळते, सप्तर्षी सोबतीला जिथे,

होडीत लंगडा म्हातारा, वाट बघत बसला तिथे.”

They climbed the last hill. Down below was Peg Leg Joe waiting at the wide Ohio River to carry them across. Their spirits rose when they saw the old man. Molly and James and Isaiah, old Haddie and George ran to the shore.

अखेरीस शेवटचा डोंगर चढून ते खाली आले. तिथे पेग-लेग-जो त्यांना ओहायो नदीच्या पार पोहोचवण्यासाठी आतुर उभा होता. म्हाताऱ्या नाविकाला पाहून जेम्सला खूप बरे वाटले. मोली, जेम्स, यशया, वृद्ध हॅडी आणि जॉर्ज त्याच्याकडे धावत गेले.

Under a starry sky Joe rode them across the wide Ohio River. He told them of hiding places where they would be safe – a path of houses stretched like a train on a secret track leading north to Canada. He called it the Underground Railroad. It carried riders to freedom.

त्या चांदण्या रात्री पेग-लेग-जोने त्या सर्वांना रुंद ओहायो नदीच्या पार नेले. त्याने जेम्सला तेथील सुरक्षित घरांचा पत्ता दिला. ही घरे उत्तर दिशेत कॅनडापर्यंत एका गुप्त मार्गावर रेल्वेच्या डब्यांसारखी वसलेली होती. या मार्गाला "अंडरग्राउंड रेलरोड" म्हणत. हा 'रेलरोड' गुलामांना मुक्ती देत असे.

The first safe house stood on the hill. The lamp was lit which meant it was safe to come. Ragged and wary they waited well. Joe signaled low with a hoot like an owl. Then the door opened wide to welcome the freedom travelers.

पहिले सुरक्षित घर एका टेकडीवर होते. घरामध्ये दिवा जळत होता. म्हणजे, सर्व काही आलबेल होते. थकले-भागलेले जेम्सचे कुटुंब धीर धरत थांबले. मग पेग-लेग-जोने हळूच शीळ वाजवली. घराचा दरवाजा उघडला आणि मुक्तीच्या प्रवाशांचे तिथे स्वागत झाले.

They were rushed through the house to the barn for the farmers knew there were slave-catchers near.

गुलामांना पकडणारे शिपाई त्या भागात फिरतात, हे घराच्या मालकाला माहीत होते. म्हणून, थोड्याच वेळात तो जेम्सच्या कुटुंबाला त्याच्या शेतात घेऊन गेला.

A trapdoor on the floor took them under the barn to hide until it was safe to move on. Then Peg Leg Joe went back to the river to meet others who followed the Drinking Gourd.

पेग-लेग-जो पुन्हा ओहायो नदीकिनारी परतला. तिथे नव्याने येणाऱ्या मुक्ती प्रवाशांना नदी पार आणण्यासाठी. घरमालकाने जेम्सच्या कुंटुंबाला सावधगिरी म्हणून शेतातील तळघराकडे नेले.

This time James called the signal a hoot like an owl that opened the door to a Quaker farm the travelers were led to a secret room hidden behind the shelves.

यावेळी जेम्सने शीळ वाजवून इशारा दिला आणि तळघराचा दरवाजा उघडला. तिथे घरमालकाने प्रवाशांना एका कपाटामागे असलेल्या गुप्त खोलीत लपवून ठेवले.

With dangers still near to close for ease the farmers send the five travelers on. He drew a map that showed the way to North on the midnight road to the next safe house just over two hills.

तळघरात जास्त वेळ थांबणेही धोक्याचे होते. घरमालकाने प्रवाशांना पुढे पाठवले. त्याने जेम्सला एक नकाशा दिला. त्यात उत्तरेकडे जाण्याचा मार्ग दाखवला होता. प्रवासी रात्रभर प्रवास करून आणि दोन डोंगर पार करून दुसऱ्या सुरक्षित घरात पोहोचले.



They rested here for many days and heal their wounds soft beds, full meals, new clothes; hot baths washed away some fear and pain.

प्रवासी काही दिवस या घरात राहिले. चालूनचालून दमलेल्या आपल्या पायांना त्यांनी आराम दिला. तिथे त्यांना पोटभर जेवण, नवे कपडे, रात्री झोपायला मऊ गाद्या असलेला पलंग आणि आंघोळीसाठी गरम पाणी मिळाले. यामुळे त्यांचे भय, वेदना कमी झाल्या.

Isaiah smiled.

बऱ्याच दिवसांनी इथे यशयाचा चेहरा खुललेला दिसला.

When they were strong they traveled again from house to house on the underground trail still following the drinking gourd north.

अंगात पुन्हा जोम आल्यावर प्रवासी बाहेर पडले. एका सुरक्षित घरातून ते दुसऱ्या घरात गेले. सतत सप्तर्षी ताऱ्यांच्या दिशेत पुढे जात राहिले.

Sometimes they traveled on foot, sometimes they by cart. The wagon they rode near their journeys and carried fruit to market and runaways to freedom.

ते नेहमी पायीपायी चालत असत. काही वेळा घोडागाडीने प्रवास करत. घोडागाड्यांमध्ये बाजारात विकायला नेण्यासाठी फळे लादलेली असत. त्यामुळे कुणाला काही संशय येत नसे. याप्रकारे मुक्ती प्रवाशांनी आपला प्रवास सुरू ठेवला.

At last they came to the shores of Lake Erie. Molly and James and Isaiah old Haddie and young George climbed aboard the steamship that would carry them across to Canada for freedom. Five more souls are safe old Haddie cried. The sun shone bright when they stepped on land. They had followed the Drinking Gourd.

शेवटी ते ईरी सरोवराच्या किनाऱ्यावर पोहोचले. तिथे वाफेवर चालणाऱ्या जहाजातून सरोवरापल्याड कॅनडात गेले. वृद्ध हॅडीचे डोळे आनंदाश्रुंनी डबडबले. कुटुंब सहीसलामत राहिल्यामुळे ती खुश होती. कॅनडात सूर्य तेजाने तळपत होता. सप्तर्षी ताऱ्यांच्या दिशेतील प्रवास यशस्वी झाला होता.